# शिवजयंती उत्साहात साजरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शहरासह परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



कोल्हापूर : विद्यापीठात शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.

### शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वज फडकावण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत आदी उपस्थित होते. शिवजयंतीच्या निमित्ताने विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

### छत्रपती शिवाजी महाराज धर्मनिरपेक्ष राजे : पाटील

बारा मावळ प्रांतातील अठरा पगड जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन प्रस्थापितांशी व स्वकीयांशी लढा देत स्वराज्य उभे करणारे छत्रपती शिवाजी महाराज निधर्मी राजे होते. त्यामुळेच त्यांना रयतेचा राजा म्हणून ओळखले जाते. ते केवळ मराठा समाजाचे नव्हते तर हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहत होते. त्यामुळे इतक्या वर्षांनीही आपण त्यांचे स्मरण करतो, असे उद्‌गार प्रा. टी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. सुभाष सावंत यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संभाजीराव जगदाळे यांनीही छत्रपतींचे कार्य व स्वराज्यातील किल्ल्यांची माहिती दिली. यावेळी बाबुराव कदम, संग्राम माने, दिलीपकुमार जाधव, रवी जाधव, विश्वास चौगुले आदी उपस्थित होते.

### यूथ मुव्हमेंट फाऊंडेशन

यूथ मुव्हमेंट फाऊंडेशनच्या वतीने शिवजयंतीनिमित्त शालेय साहित्य व धान्य जमा करण्यात आले. सोशल मीडियाच्या माध्यमातून संस्थेने हे आवाहन केले होते. याला प्रतिसाद मिळाला. या उपक्रमामध्ये अमित कांबळे, गिरीश सावंत, संदीप हेर्लेकर, योगेश देवकुळे आदी सहभागी होते.

# विद्यापीठात शिवजयंती उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शिवजयंती उत्साहात साजरी झाली. या निमित्ताने विद्यापीठ इमारतीसमोर असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार घातला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाचा ध्वज फडकवण्यात आला. त्यांनी शिवाजी महाराजांच्या मूर्तीला अभिवादन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह पदाधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्यापीठ सामाजिक वंचितता, समावेशक धोरण केंद्रातर्फे आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्यावतीने रविवारी (दि.२१) इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील असणार आहेत. याप्रसंगी संदीप चौधरी, औरंगाबाद; डॉ. राहुल भगत, नागपूर; डॉ. विलास आढाव, पुणे; मार्गदर्शन करणार आहेत. व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राचे संचालक प्रा.डॉ.जगन कराडे यांनी केले आहे.

# महाविद्यालयांनी शैक्षणिक दर्जा उंचवावा

## मंत्री उदय सामंत; सायबरमध्ये डेटा सेंटर, शिंदे स्कूल इमारतीचे उद्घाटन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महाविद्यालयांनी शैक्षणिक दर्जा उंचावणे क्रमप्राप्त आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज येथे केले. विरोधकांनी शिक्षण क्षेत्रात राजकारण करू नये, असा टोलाही त्यांनी लगावला.

सायबर आयोजित रुसा अंतर्गत कार्यान्वित होणाऱ्या डेटा सेंटर व राधाबाई शिंदे ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या (सीबीएसई) इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

श्री. सामंत म्हणाले, सायबर



**कोल्हापूर : सायबर आयोजित रुसा अंतर्गत कार्यान्वित होणाऱ्या डेटा सेंटर व राधाबाई शिंदे ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या (सीबीएसई) इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत. शेजारी ऋषीकेश शिंदे, अॅड. श्रीपतराव शिंदे, आमदार प्रा. जयंत आसगावकर आदी.**

महाविद्यालयाचे शिक्षण क्षेत्रातील योगदान कौतुकास्पद असून येणाऱ्या काळात देखील सायबरतर्फे सामाजिक उपक्रम होत राहतील, असा विश्वास आहे.'

ते म्हणाले, 'परीक्षा रद्द करणारा मंत्री, अशी माझी ओळख झाली आहे.

खासदार प्रा. संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, संस्थेचे सचिव व कार्यकारी विश्वस्त डॉ. आर. ए. शिंदे, माजी आमदार अॅड. श्रीपतराव शिंदे, डॉ. टी. ए. शिवारे, ऋषिकेश शिंदे, माजी कुलगुरू डॉ. विजय खोले, माजी कुलगुरू डॉ. बी. पी. साबळे, प्राचार्य डॉ. कुलकर्णी, अनुजा वनकुद्रे उपस्थित होते. डॉ. एस. एस. आपटे यांनी सूत्रसंचालन केले.

### लाडका मंत्री म्हणून टीका

तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोचावे, ही आघाडी सरकारची भूमिका आहे. राज्यपाल विद्यापीठाचे कुलपती असल्याने शिक्षणासंदर्भातील कोणताही निर्णय घ्यायचा झाल्यास त्यांच्याशी चर्चा करावी लागते. त्यासाठी राजभवनात किंवा परिसरातून गेलो तरी विरोधक राज्यपालांचा लाडका मंत्री म्हणून टीका करतात, असे श्री. सामंत यांनी स्पष्ट केले.

# महाविद्यालयात साजरा होणार स्वराज्य दिन!

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांची घोषणा : आठ दिवसात शासन आदेश काढणार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्य आणि कार्याची प्रेरणा आणि ऊर्जा युवापिढीला मिळावी या व्यापक उद्देशाने राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात दरवर्षी स्वराज्य दिन साजरा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयाची घोषणा राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी कोल्हापुरात केली. या संदर्भात येत्या आठ दिवसात उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाच्या



वतीने शासकीय आदेश जारी केला जाईल, असेही मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.

येथील सायबर कॉलेजमधील रूसा अंतर्गत डेटा सेंटर आणि सी. बी. एस. ई. राधाबाई शिंदे इंग्लिश मीडियम स्कूल इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी मंत्री सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

सामंत म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची स्थापना केली. सर्व जाती–धर्मातील मावळ्यांना बरोबर घेऊन स्वराज्याच्या रक्षणासाठी लढा दिला. शेती, विविध व्यवसाय, व्यापारउदीम, संरक्षण यासह राजकारण, समाजकारण, युद्धनीती आदी विविध क्षेत्रात त्यांनी केलेले नियोजन, व्यवस्थापन, घेतलेले निर्णय यांची माहिती आजच्या युवा पिढीला मिळावी, या व्यापक हेतूने स्वराज्य दिन महाविद्यालयात साजरा करण्यासंदर्भात विचार झाला. आता तो प्रत्यक्षात आणण्यात येणार आहे. त्यासाठी येत्या आठ दिवसात शासकीय आदेशही काढला जाईल.

**उर्वरित प्रश्न सोडवण्याचा युद्धपातळीवर प्रयत्न**

'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय आपल्या दारी' हा उपक्रम जाहीर झाल्यानंतर कोल्हापूर विभागीय सहसंचालक कार्यालयातील ३६३५ प्रलंबित प्रकरणांपैकी ३०३४ प्रकरणे मार्गी लागली. या उपक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाचा एक नवा पैसाही मी खर्च केलेला नाही. प्राध्यापक, कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी यांचे प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होते.

पान ४ पहा

# महाविद्यालयात साजरा होणार स्वराज्य दिन!

पान १ वरुन

ते सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. एखाद्या कर्मचाऱ्यांच्या निधनानंतर त्याच्या कुटुंबीयांपुढे संसाराचा गाडा कसा चालवायचा, असा प्रश्न निर्माण झाला होता. मृत ७ कर्मचाऱ्यांच्या मुलांना ऑन दी स्पॉट अनुकंपाखालील नोकरीची ऑर्डर दिली. त्यामुळे विरोधक सोशल मिडीयाच्या माध्यमातून माझ्यावर काय टीका करतात याकडे मी लक्ष देत नाही, असा टोलाही मंत्री सामंत यांनी भाजपचे नाव न घेता लगावला.